# बाल गोपालकृष्ण

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा
दा. क्र. ४९२



BVBK-0400492

# बाल गोपालकृष्ण

[ श्रीकृष्ण कथा ]

: लेखक :

## भालचंद्र वैद्य

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
४८२
बा. वा.

ज्योत्स्ना प्रकाशन

BVBK-0400492

मूल्य सव्वा रुपया

वसुदेव सुतम् देवम् कंसचाणूर मर्दनम् ।
देवकी परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥

☆

पहिली आवृत्ती : २६ जानेवारी १९६१
दुसरी आवृत्ती : १ जून १९६३
तिसरी आवृत्ती : ४ मार्च १९६७
चौथी आवृत्ती : ५ जून १९७०
पाचवी आवृत्ती : १५ ऑगस्ट १९७२
सहावी आवृत्ती : विजया दशमी २५ ऑक्टोबर १९७४
सातवी आवृत्ती : ११ डिसेंबर १९७७

☆

मुद्रक : आर. जी. देसाई, न्यू एज प्रिं. प्रेस, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई २५.
प्रकाशक : ल. गो. परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगाव, मुंबई ४.

मुलांनो, गोपालकृष्णाच्या पुष्कळ गोष्टी तुम्ही ऐकल्या असतील. फार गमतीच्या आहेत त्या.

त्या गोपालकृष्णाचे चरित्र पण मोठे मनोरंजक आहे.

ते चरित्रच थोडक्यात सांगावयाचे ठरविले आहे मी.

ऐका बरे का !

सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. त्या वेळी आपल्या भारतात लोकवस्ती अगदी कमी होती. जिकडे तिकडे मोठमोठी जंगले होती.

मधून मधून जेथे लोकवस्ती असे, तेथे लहान लहान राज्ये असत. त्यातलेच शूरसेन हे एक राज्य.

शूरसेन राज्याची मथुरा ही राजधानी.

मथुरा शहर यमुना नदीच्या काठी वसले आहे.

मथुरेचा राजा उग्रसेन. तो नीतीने राज्य करून प्रजेचे कल्याण साधीत असे. उग्रसेनचा मोठा मुलगा कंस.

कंस फार पराक्रमी खरा, पण अतिशय दुष्ट होता. त्याने उग्रसेनला कैदेत टाकले व आपण मथुरेचा राजा झाला. त्याच्या दुष्टपणामुळे सगळी प्रजा अगदी त्रासून गेली होती.

कंसाची चुलत बहीण वसुदेव नावाच्या एका गोप सरदाराला दिली होती. वसुदेव सुस्वभावी आणि नीतीने वागणारा होता.

एकदा कंसाला कोणीतरी सांगितले, कंसा, देवकीचा आठवा पुत्र तुझा नाश करील. तेव्हा वेळीच उपाय करून ठेव.

ही बातमी ऐकताच कंस रागावला व त्याने ताबडतोब वसुदेव-देवकी ह्या दोघांना पकडून मथुरेतील एका वाड्यात कैद करून ठेविले.

देवकीची सगळीच मुले मारून टाकली म्हणजे आपल्याला शत्रू राहणार नाही, असा विचार करून त्याने देवकीला सांगितले की, तुला होणारे प्रत्येक मूल जन्मल्याबरोबर माझ्या स्वाधीन कर.

वसुदेव व देवकी ह्यांना ज्या वाड्यात ठेविले होते तेथे पहारा बसविण्याचीही कंसाने व्यवस्था केली.

बिचाऱ्या वसुदेवाला उगाच कैदेत ठेविल्याबद्दल लोकांना फार वाईट वाटले, पण कंसापुढे कोण बोलणार!

★

## श्रीकृष्णजन्म

काही दिवसांनंतर देवकीला एक मूल झाले

लागलीच पहारेकऱ्यांनी ती बातमी कंसाला कळविली.

बातमी ऐकताच कंस तावडतोब वाड्यात आला.

त्याने देवकीच्या रडण्याकडे लक्ष न देता तिच्या मांडीवरून मूल ओढून घेतले व वाड्याबाहेरील शिळेवर आपटले.

अशाप्रकारे कंसाने देवकीची सात मुले मारून टाकली.

आपली मुले मारल्याबद्दल वसुदेव-देवकी ह्यांना फार दुःख होई, पण त्यांचा काही इलाज चालेना.

देवकीचा आठवा मुलगा आपला शत्रू आहे हे कंसाला कळले होते. म्हणून

आठव्या मुलाच्या वेळी वाड्यावर अधिक कडक पहारा ठेवण्याची कंसाने व्यवस्था केली.

आठव्या वेळी देवकी रात्री बाराच्या सुमारास प्रसूत झाली.

तो श्रावण महिन्यातील वद्य सप्तमीचा दिवस होता.

जन्माला आलेला मुलगा अतिशय सुंदर नि तेजस्वी होता. त्या बालकाला पाहून वसुदेव-देवकी ह्या दोघांनाही मोह उत्पन्न झाला.



देवकी वसुदेवाला म्हणाली, कसेही करून माझ्या ह्या सुंदर बाळाला वाचवा.

देवकीची विनवणी ऐकून काही झाले तरी ह्या बाळाला वाचवावयाचे असे ठरवून लगेच वसुदेव मुलाला खांद्यावर घेऊन निघाला.

यमुनेच्या पलीकडे गोकुळात त्याचा जिवलग मित्र नंद म्हणून एक गोप सरदार होता. त्याच्याकडे जावयाचे वसुदेवाने ठरविले.

मध्यरात्रीची वेळ असल्यामुळे वाड्यात जिकडे तिकडे सामसूम होते.

पहारेकरी खुशाल घोरत पडले होते.

तो श्रावण महिना असल्यामुळे धो धो पाऊस पडत होता. वाड्याच्या दारावर पहारेकरी झोपले होते. त्यांची भीती न

बाळगता वसुदेव तसाच बाहेर पडला. ह्या वेळी यमुनेला पूर आला होता. पूर फार जोराचा होता; पण वसुदेव तसाच नदीत शिरला.

खांद्यावर घेतलेल्या बालकाच्या पायाला पाणी लागताच चमत्कार झाला.

एकदम यमुनेचे पाणी दुभंगले. वसुदेव झटकन सुरक्षितपणे नदीपार झाला.

इकडे गोकुळात नंदाची पत्नी यशोदा त्याच वेळी प्रसूत झाली होती.

वसुदेव नंदाच्या घरी गेला तेव्हा सगळीकडे सामसूम होते.

वसुदेवाने देवकीचा मुलगा यशोदेच्या कुशीत ठेविला व नुकतीच जन्मलेली मुलगी घेऊन तो तडक मथुरेला परतला.

हे सगळे होईपर्यंत कोणीच जागे झाले नाही.

वसुदेव पहाटेच्या सुमारास परत आल्यावर पहाऱ्यावरची मंडळी जागी झाली.

त्यांनी देवकी प्रसूत झाल्याचे पाहून लागलीच ती बातमी कंसाला कळविली.

बातमी ऐकून कंस धावतच वाड्यात आला. त्याने देवकीच्या पुढ्यात असलेले मूल पाय धरून उचलले.

तेव्हा देवकी गयावया करून कंसाला म्हणाली, दादा, ही मुलगी आहे, हिला मारू नकोस रे!

पण कंसाने तिचे ऐकले नाही. त्याने त्या मुलीला बाहेर आणून शिळेवर आपटले. बिचारे ते बाळ मरून पडले.

आता आपणास शत्रू राहिला नाही, असे वाटून कंस अधिकच दुष्टपणाने वागू लागला.

★

इकडे नंदाला मुलगा झाल्याचे ऐकून सगळ्या गोकुळास आनंद झाला.

त्या सुंदर बालकाला पाहून नंद-यशोदेला तर मोह पडलाच, शिवाय गोकुळात सर्वच गोप-गोपींना ते सुंदर बालक पाहून मोह उत्पन्न झाला.

गोकुळात खूप मोठा उत्सव केला व बारशाच्या दिवशी त्या सुंदर बालकाचे नाव कृष्ण असे ठेविले.

हाच आपला बाल गोपालकृष्ण.

कृष्ण फार सुंदर नि तेजस्वी होता. त्यामुळे सगळ्यांनाच तो हवासा वाटे.

त्याला पाहण्यासाठी गोकुळातील गोपगोपी रोज मुद्दाम नंदाकडे येत.

श्रीकृष्ण जसजसा मोठा होऊ लागला तसतशा त्याच्या बाललीला पाहून सगळ्यांना तो अधिकच आवडू

लागला. बाल गोपालकृष्णाला दूध, दही नि लोणी फार आवडत असे.

गोकुळात दही-दूध नि लोणी यांची लयलूट होती.

कृष्ण कोणत्याही घरात शिरून दही, दूध, लोणी खात असे.

त्याच्यावर कोणी रागवत नसे. कारण तो सगळ्यांचाच आवडता होता.

आपले मित्र जमवावे नि कुठल्यातरी गोपीच्या घरात शिरून दही, दूध, लोणी जे मिळेल ते खावे आणि पसार व्हावे. असे रोज चालायचे.

एकदा कृष्णाने आपल्या घरी सगळ्या बाल मित्रांना जमवून घरचे दही नि दूध संपवले.

यशोदेला कृष्णाचा फार राग आला. ह्याच वेळी गोकुळातील साऱ्याच गवळणी यशोदेकडे तक्रार घेऊन आल्या.

त्या यशोदेला म्हणाल्या, "बाई यशोदे, तुझा मुलगा आमचे सगळे दही-दूध खाऊन टाकतो. त्याला मारू नको. पण रागे भर."



आधीच यशोदेला कृष्णाचा राग आला होता. तिने लागलीच श्रीकृष्णाला हाक मारली. तो येताच त्याला शिक्षा करण्यासाठी सगळ्या गोपींच्या देखत उखळाशी बांधून ठेविले.

मग सगळ्याजणी कामाला निघून गेल्या.

कृष्णाने जोर करून उखळ खाली पाडले नि तो उखळासह अंगणात आला.

अंगणाच्या शेवटी दोन मोठे जुनाट वृक्ष जवळ जवळ होते. त्यांच्यामधून श्रीकृष्ण मुद्दामच जाऊ लागला. तो ते उखळ वृक्षांमध्ये अडकले.

श्रीकृष्णाने पुन्हा जोर करून पुढे जाण्याचा प्रयत्न करताच ते दोन्ही वृक्ष उन्मळून पडले. त्याचा खूप मोठा आवाज झाला.

तो आवाज ऐकून गोकुळातील लहान-मोठी माणसे तेथे धावत आली.

यशोदा तर अगदी घाबरून गेली. तिने धावत पुढे जाऊन कृष्णाला सोडले नि त्याला पोटाशी घट्ट धरून म्हटले,

"कृष्णा, मी आता तुला कधी शिक्षा करणार नाही."

वृक्ष पडल्यामुळे श्रीकृष्णाला काही इजा झाली नाही, हे पाहून सगळ्यांना समाधान वाटले.

गोपी यशोदेला म्हणाल्या, "बाई यशोदे, आम्ही आता कृष्णाबद्दल तुला तक्रारी सांगणार नाही.

♣

## वनक्रीडा

श्रीकृष्ण व त्याचा भाऊ बलराम हे दोघे सात वर्षांचे झाल्यावर त्यांना उत्तम वस्त्रे नेसवून डोईवर मोरपिसांचा मुकुट घालून व हातात काठी आणि पावा देऊन गाई व वासरे चारावयास वनात पाठविले.

तेव्हापासून ते दोघे भाऊ दररोज सकाळी न्याहारी करून रानात गुरे राखावयास जाऊ लागले.

त्यांच्याबरोबर आणखी पुष्कळ गवळ्यांची मुलेही जात असत.

तेथे रानात ही मुले निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळून सगळा दिवस मजेत घालवीत.

श्रीकृष्ण सगळ्यांचा आवडता; त्यामुळे कृष्णाजवळ आपण नेहमी असावे असे सगळ्या गोपाळांना वाटे.

सवंगड्यांबरोबर कधी खूप धावावे, कधी पक्ष्यांचे आवाज करावे, कधी झाडांवरची फळे काढावी, एकमेकांना वाकुल्या दाखवाव्या तर कधी निरनिराळे खेळ खेळावे असे रोज चालायचे.

दुपार झाली की श्रीकृष्ण यमुनेच्या काठी असलेल्या एखाद्या मोठ्या वृक्षा-खाली उभा राहून आपला पावा वाजवू लागे.

तो आवाज ऐकून सगळे सवंगडी नि गाईवासरे त्याच्या भोवती जमत.

भरपूर पाणी पिऊन गाई नि वासरे रवंथ करू लागली, की कृष्ण नि त्याचे बालसवंगडी एकत्र बसून मजेत जेवण करीत. कृष्णाच्या हातचा घास सगळ्यांना आवडत असे.

ह्या बालमित्रांत कृष्णाचा सगळ्यांत आवडता मित्र पेंद्या.

पेंद्याची पण कृष्णावर फार भक्ती होती. कृष्ण जरा कोठे दिसेनासा झाला की, तो कावराबावरा होई.

संध्याकाळ झाली की, सगळे घरी परत येत. तेव्हा पुन्हा केव्हा एकदा सकाळ होते नि आपण कृष्णाबरोबर वनात जातो असे त्यांना होत असे.

★

## कालिया-मर्दन

आता श्रीकृष्ण नि बलराम दोघेही थोडे मोठे झाले.

दूध, दही नि लोणी भरपूर खावे, गाईवासरांना घेऊन सवंगड्यांबरोबर रानात जावे, कुस्त्या खेळाव्या, गळ्यात फुलांचे हार नि डोईवर मोरपिसांचे मुकुट घालून मुरलीच्या नादात नाचावे व मौज करावी, हा त्यांचा नेहमीचा उद्योग सुरूच होता.

गोपांच्या वस्तीपासून सुमारे एका कोसावर यमुना नदीत खूप खोल पाण्याचा एक डोह होता.

ह्या डोहात कालिया नावाचा एक भयंकर काळा सर्प राहात असे.

त्याच्या विषामुळे त्या डोहाचे पाणी विषारी बनले होते. त्याच्या भीतीने त्या डोहाच्या आसपास पशू, पक्षी, अगर

माणसे फिरकेनाशी झाली होती. त्या भागात भयंकर रान माजले होते.

ह्या कालियाचा नाश करून ते पाणी शुद्ध करायचे नि सर्वांची भीती नाहीशी करायची असे श्रीकृष्णाने आपल्या मनाशी ठरविले.

मग एके दिवशी आपल्या सवंगड्यांची नजर चुकवून कृष्ण त्या डोहाजवळ गेला.

तेथे असलेल्या एका कदंबाच्या झाडावर चढून त्याने दंड थोपटले. एक जोराची आरोळी ठोकली नि डोहात उडी घेतली. त्याबरोबर डोहातील पाणी जोराने चोहोबाजूस उसळले.

पाणी उसळलेले पाहून कालिया खवळला नि पाण्यावर आला.

रागाने त्याचे डोळे लाल झाले असून तो आपल्या पाचही फडांतून सगळीकडे विष पसरीत होता.

त्याने श्रीकृष्णाला घट्ट विळखा घातला नि त्याला चावण्यासाठी तो प्रयत्न करू लागला. हे पाहून श्रीकृष्णाने त्याची मान घट्ट आवळून धरली.

इतक्यात कृष्ण कोठे दिसेना म्हणून त्याचा शोध करीत त्याचे सवंगडी तेथे आले; पण तो भयंकर देखावा पाहून ते अगदी घाबरून गेले नि " अहो कोणी तरी आमच्या श्रीकृष्णाला वाचवा हो " असे ओरडत गोकुळाकडे धावले.

ती ओरड ऐकून सगळे गोकुळ यमुनेच्या त्या डोहावर जमा झाले.

सगळेजण अगदी घाबरून गेले. यशोदा तर मोठमोठ्याने आक्रोश करू लागली.

मातेचा तो शोक पाहून श्रीकृष्णाने कालियाचे नरडे अधिक जोराने दाबले. तेव्हा तो साप घाबरला. त्याचे कृष्णाभोवतालचे विळखे सैल झाले. तेव्हा

श्रीकृष्णाने त्याच्या मस्तकावर चढून जोराने नाचावयास सुरुवात केली.



शेवटी कालिया शरण आला. यमुनेच्या त्या डोहातून तो दूर निघून गेला.

श्रीकृष्ण नदीकाठी आल्यावर यशोदेने त्याला घट्ट मिठी मारली.

सगळ्यांना आनंद झाला. मग सगळेजण श्रीकृष्णाची गाणी म्हणत मोठ्या उत्साहाने कृष्णासह गोकुळात परतले.

★

भरपूर दूध, दही नि लोणी खाऊन सर्वच गोपाळ धष्टपुष्ट झाले होते. त्यात कृष्ण–बलरामाची शक्ती तर विचारूच नका.

कुस्ती खेळणे हा त्यांचा आवडता खेळ. त्यात दोघेही अगदी पटाईत झाले.

चांदण्या रात्री रास-क्रीडा हा गोपाळांचा दुसरा आवडता खेळ.

गोपाळकृष्ण कधी बासरी वाजवी तर कधी त्या गोप-गोपींसह रास खेळत असे.

एकदा रात्रीच्या वेळी गोप-गोपी जमून कृष्णासह मोठ्या आनंदाने टिपऱ्यांचा खेळ खेळत असता एक काळा कुळकुळीत भयंकर मस्त बैल गोकुळात शिरला.

तो बैल कोळशासारखा काळा होता– त्याचे डोळे निखाऱ्यासारखे चमकत होते

नि शिंगे तलवारीच्या टोकाप्रमाणे तीक्ष्ण होती. त्याच्या धडकेने मोठमोठे वृक्षही उन्मळून पडत होते.

त्याच्या भीतीने सगळे गोप गांगरून सैरावैरा पळू लागले.

इतक्यात श्रीकृष्ण पुढे झाला. त्याने त्या मस्त बैलाची दोन्ही शिंगे दोन्ही हातांनी धरून त्याला जोराने मागे रेटले. मग त्याची मान पिरगळून त्याला खाली पाडले. नंतर त्याचेच एक शिंग उपटून त्या शिंगाने एक जोराचा फटका त्याच्या तोंडावर मारताच तडफडून तो बैल मरून पडला.

हा श्रीकृष्णाचा पराक्रम पाहून सगळ्या गोप-गोपींना नवल वाटले.

सगळे गोकुळ कृष्णाला देवाप्रमाणे भजू लागले.

★

नुकताच पावसाळा संपून शरद्ऋतू सुरू झाला होता.

गोप-गोपींनी दरसालप्रमाणे इंद्राचा उत्सव करण्याची तयारी सुरू केली.

हा इंद्राचा उत्सव कशासाठी ? असे श्रीकृष्णाने म्हणताच एक म्हातारा गोप म्हणाला,

कृष्णा, इंद्रदेव पाऊस पाडतो. त्यामुळे पिके येतात. भरपूर हिरवे गवत उगवते. ते खाऊन गुरे पोसतात नि भरपूर दूध देतात.

पाऊस पडला नाही तर दुष्काळ पडेल. अन्नपाण्यावाचून लोकांचे हाल होतील. तेव्हा योग्य वेळी पाऊस पाडावा म्हणून इंद्रदेवाला आपण संतुष्ट केले पाहिजे; त्यासाठी हा उत्सव आहे.

यावर श्रीकृष्ण म्हणाला, "हे बरोबर नाही. खरे म्हणजे आपले सगळे जीवन डोंगर-दऱ्या नि गुरे-वासरे यांवर अवलंबून आहे."

हा पलीकडचा गोवर्धन पर्वत पाहा. कितीतरी चित्रविचित्र रंगांच्या पक्ष्यांनी शोभून दिसत आहे. त्यावरचे मोठमोठे वृक्ष फळाफुलांनी बहरून गेले आहेत. हिरवीगार कुरणे किती सुंदर दिसत आहेत पाहा.

तेव्हा आपण ह्या गोवर्धन पर्वताचा नि गाईवासरांचा उत्सव करू या.

हे कृष्णाचे म्हणणे सर्वांना पटले.

मग गाई-वासरांना निरनिराळ्या फुलांच्या माळांनी सजवून त्यांच्यासह सर्वांनी गोवर्धन पर्वताला प्रदक्षिणा घातली नि मोठा उत्सव केला.

दूध, दही, लोणी नि इतर पक्वान्ने खाऊन सर्व लोक तृप्त झाले.


सगळ्यांनाच आनंद झाला.

पण हे सगळे इंद्राला आवडले नाही.

आपला उत्सव ह्या गोपांनी केला नाही म्हणून तो रागावला नि त्याने जोराचा पाऊस पाडण्यास सुरवात केली.

सगळे गोप घाबरले, पण श्रीकृष्णाने सर्वांना धीर दिला.

त्याने सगळ्यांना आपल्या गुरां-वासरांसह गोवर्धन पर्वताच्या छपरा-सारख्या भागात आणून ठेविले.



सात दिवस खूप जोरदार पाऊस पडला, पण गोवर्धनाच्या छपराखाली असल्यामुळे गोपांना त्याचा काही त्रास झाला नाही.

शेवटी इंद्र कंटाळला नि पाऊस थांबला.

सगळी मंडळी श्रीकृष्णासह परत गोकुळात आली.

श्रीकृष्णाने जणू काय गोवर्धन पर्वत उचलून त्याखाली आपले रक्षण केले असे सगळ्या गोपांना वाटले. ते श्रीकृष्णाला गोवर्धन-गिरिधारी असे म्हणू लागले.

त्यांची श्रीकृष्णावरची भक्ती अधिकच वाढली.

★

## कंस घाबरला

इकडे श्रीकृष्ण-बलरामाच्या पराक्रमाच्या बातम्या कंसाला कळत होत्याच.

त्यांचे पराक्रम ऐकून तो मनातून घाबरून गेला.

तोच त्याला कळले की, हा श्रीकृष्ण नंदाचा मुलगा नसून तो वसुदेवाचाच आठवा मुलगा आहे.

ही बातमी कळताच कंस अधिकच भयभीत झाला. त्याने वसुदेवाला पुन्हा कैदेत टाकले.

कसेही करून श्रीकृष्णाचा नाश करावा ह्यासाठी तो विचार करू लागला.

शेवटी श्रीकृष्ण व बलराम ह्यांस मुद्दाम कुस्त्या पाहण्यासाठी बोलवावे व आपल्या पहिलवानांकडून त्या दोघांचाही नाश करावा असा त्याने मनाशी बेत ठरविला.

मग अक्रूर नावाच्या एका सरदाराला बोलावून तो म्हणाला, अक्रूरा, तू गोकुळात जाऊन श्रीकृष्णाला नि बलरामाला इकडे घेऊन ये.

ते दोघेही मल्लविदयेत पटाईत आहेत. आपल्याकडेही मोठे मल्ल आहेत. आपण कुस्त्यांचा एक मोठा उत्सवच करू येथे.

अक्रूर हा कृष्णभक्त होता. त्याने कंसाच्या आज्ञेप्रमाणे गोकुळात जाण्याचे ठरविले.

श्रीकृष्ण हा आपला शत्रू आहे, तो मथुरेत येऊ नये असे कंसाला वाटत होते. तेव्हा अक्रूर गोकुळात जाण्या-पूर्वीच कृष्णाचा नाश करण्याचा त्याने बेत केला.

केशी नावाचा कंसाचा एक पराक्रमी भाऊ होता. त्याच्याकडे कृष्णाला मारण्याची कामगिरी कंसाने सोपविली.

लगेच केशी एका भयंकर मस्त घोड्यावर बसून गोकुळाकडे यावयास निघाला.

श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांसह गाईवासरे घेऊन वनात जात असता त्यांना केशीने वाटेतच गाठले.

कृष्णाचे सवंगडी घाबरून गेले. ते कृष्णाला म्हणाले, "कृष्णा, तू त्या भयंकर घोड्याच्या वाटेस जाऊ नकोस."

पण तो घोडाच कृष्णावर धावून आला. तेव्हा कृष्णाने त्याच्या थोबाडा-वर असा जोराचा फटका मारला की, त्यासरशी तो घोडा धडपडून खाली पडला. तेव्हा त्याच्यावर स्वार होऊन आलेला केशी इतक्या जोराने खाली आपटला की, त्या धक्क्याने तो तत्काळ मरण पावला.

आणखी एक दोन फटके मारताच तो घोडाही तडफडून मेला.

हा श्रीकृष्णाचा पराक्रम पाहून सगळ्या गोपालांस आनंद झाला. त्यांनी श्रीकृष्णाचा जयजयकार केला.

*

## मथुरेतील पराक्रम

मथुरेत कुस्त्यांचा मोठा उत्सव करण्याचे ठरले. त्यासाठी खूप मोठा नि सुंदर मंडप तयार करण्याचे कामही अक्रुराकडेच दिले होते.

कंसाच्या आज्ञेप्रमाणे मोठा मंडप उभारला. त्यात कुस्त्या पाहावयास येणाऱ्या लोकांना बसण्याची सोय केली असून मध्यभागी एक मोठा कुस्त्यांचा हौदा तयार केला होता.

ह्या हौदयाजवळ मथुरेचा राजा

कंस ह्याला बसण्यासाठी सुंदर सिंहासन ठेवले होते.

सगळी व्यवस्था झाल्यावर एके दिवशी अक्रुर एक सुंदर रथ घेऊन गोकुळात गेला.

त्याने नंद व श्रीकृष्ण यांची भेट घेऊन त्यांना कंसाचा निरोप कळविला.

नंद व इतर गोप मंडळी श्रीकृष्णाला मथुरेस पाठविण्यास तयार नव्हती. पण श्रीकृष्णानेच सर्वांची समजूत घालून बलरामासह मथुरेस जाण्याचे ठरविले.

नंद, यशोदा नि इतर गोपगोपींना कृष्ण जाणार म्हणून फार दुःख झाले. पण कृष्णाचा निश्चय कायम होता.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी बलराम व श्रीकृष्ण अक्रुरासह मथुरेस जाण्यास निघाले.

रस्त्यात गोपगोपींनी कृष्णाचा रथ अडवून श्रीकृष्णाने मथुरेस जाऊ नये

म्हणून त्याची खूप विनवणी केली, परंतु श्रीकृष्णाने त्यांची समजूत घालून त्यांना पुन्हा गोकुळात जावयास सांगितले.

रथ पुढे निघाला नि योग्य वेळी मथुरेस पोचला.

मथुरेत ह्या दोघांना रहाण्यासाठी एक मोठा वाडा सजवून तयार ठेवला होता.

इकडे कंसाने आपल्या दरबारातील मुख्य मल्ल चाणुर व मुष्टिक यांना बोलावून ताकीद दिली की, कृष्ण आणि बलराम ह्यांना कसेही करून मारून टाका. ते लहान मुलगे आहेत म्हणून बेसावध राहू नका.

इतके करून देखील कंसाचे समाधान झाले नाही.

मग त्याने खूप मस्त अशा आपल्या हत्तीच्या माहुताला बोलावून सांगितले की, कृष्ण मंडपात येण्यापूर्वी हत्ती

दरवाजात उभा ठेव, कृष्ण दरवाजात येताच हत्तीला त्याच्या अंगावर सोडून दे.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी जंगी कुस्त्यांची दंगल सुरू झाली.

कुस्त्या पाहण्यास मथुरेतील सर्व प्रकारचे हजारो लोक जमले होते.

ठरलेल्या वेळी बलराम व श्रीकृष्ण रथात बसून मंडपाजवळ आले.

त्यावेळी ते फारच सुंदर दिसत होते.

ते दोघे मंडपाच्या दाराजवळ येऊन पोचले, तोच तो मस्त हत्ती त्यांच्या अंगावर धावला.

श्रीकृष्णाने न घाबरता त्या हत्तीची रग जिरवण्यासाठी दंड थोपटले व तो धावत जाऊन त्या मस्त हत्तीच्या पोटाखाली शिरला.

तेथे त्याने हत्तीच्या पोटावर जोरदार ठोसे मारण्यास सुरवात केली.

त्या माराने हत्ती बेजार झाला व कृष्णाला शोधण्यासाठी गुडघे टेकून आपल्या दोन पायांमध्ये त्याने सोंड घातली. तेव्हा कृष्ण चटकन बाहेर आला. त्याने हत्तीचे दात खूप जोराने दाबले. तोच एक दात मोडला. तो मोडलेला दात घेऊन श्रीकृष्णाने त्या हत्तीच्या कपाळावर अनेक जोरदार फटके मारले. त्या मारामुळे शेवटी तो मस्त हत्ती मरून पडला.

हा कृष्णाचा पराक्रम पाहून कंस मनातून अगदी घाबरून गेला.

इकडे हौद्यामध्ये पुष्कळ कुस्त्या सुरू होत्या. त्याकडे आता कोणाचेच लक्ष नव्हते. सर्वांचे लक्ष महापराक्रमी श्रीकृष्णाकडे होते. कृष्ण व बलराम मंडपात येऊन बसताच चाणुर व मुष्टिक हे दोघे मल्ल हौद्यात उतरले. इतर कुस्त्या थांबल्या.

मग त्या दोघांनी दंड थोपटून आपणाबरोबर कुस्ती करण्यास कोणी तयार आहे काय? असे जमलेल्या सगळ्या मल्लांस विचारले, पण त्यांच्याबरोबर कुस्ती करण्यास कोणीच पुढे येईना.

इतक्यात बलराम व श्रीष्कृण हौदयात उतरले. त्या दोघांची चाणुर आणि मुष्टिक ह्यांच्याबरोबर कुस्ती सुरू झाली.

खूप वेळ दोघांची कुस्ती चालू होती. ती भयंकर कुस्ती पाहून सगळे लोक घाबरून गेले.

इतक्यात बलरामाने मुष्टिकाच्या छातीवर असा जोराचा गुद्दा मारला की, तो तात्काळ खाली पडला नि रक्त ओकून मेला.

श्रीकृष्णाने तर चाणुरास उचलून गरगरा फिरविले व जमिनीवर आपटले. तोही लागलीच मरून पडला.

हा भयंकर प्रकार पाहून कंस घाबरला. त्याचे पाय लटलटा कापू लागले.



इतक्यात कंस बसला होता तिकडे श्रीकृष्ण धावला. त्याने केस धरून कंसाला सिंहासनावरून खाली ओढले.

आधीच घाबरून गेलेला कंस जोराने जमिनीवर आदळताच गतप्राण झाला.

कंसाचा शेवट झालेला पाहून मथुरेच्या प्रजाजनांना मनातून आनंद झाला. कृष्णाने मथुरेचे राज्य उग्रसेनला दिले.

## मथुरेतून प्रयाण

वसुदेवाने बलराम व श्रीकृष्ण ह्या दोघांच्या मुंजी करून त्या दोघांना उज्जयिनीस सांदीपनी नावाच्या एका थोर गुरुकडे शिक्षणासाठी पाठविले.

गुरुगृही राहून त्या दोघांनी वेदविदया व शस्त्रविदया ह्यांचे शिक्षण घेतले.

त्यांची हुशारी, गुरुभक्ती नि मेहनत पाहून गुरुजी संतुष्ट झाले.

उज्जयिनीस सहा महिने राहून बलराम व श्रीकृष्ण हे दोघे विदया संपादन करून परत आलेले पाहून सगळ्यांना फार आनंद झाला.

ह्याच सुमारास कंसाचा सासरा जरासंध राजा कृष्णाचा नाश करण्यासाठी मथुरेवर चालून आला. पण श्रीकृष्णाने त्याचा पराभव केला.

पुढे लवकरच विदर्भाचा राजा महान भीष्मक याची कन्या रुक्मिणी हिज-बरोबर श्रीकृष्णाचे लग्न झाले.

जरासंधाला हे आवडले नाही. त्याने पुन्हा मथुरेवर स्वारी केली.

तेव्हा आपल्यामुळे मथुरेतील लोकांना त्रास होऊ नये म्हणून श्रीकृष्ण काही यादवांसह मथुरेतून बाहेर पडला.

बरोबरच्या यादवांची मदत घेऊन त्याने समुद्रकिनारी द्वारका नावाचे एक नवीन शहर वसविले व तेथे तो सुखाने राज्य करू लागला.

## दुष्टांचा नाश

हस्तिनापूरचे पांडव श्रीकृष्णाचे अगदी जिवलग मित्र होते. कौरवांनी पांडवांचे राज्य हिरावून घेतले. ते मिळविण्यासाठी कौरव-पांडवांचे मोठे

युद्ध झाले. श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूला होता. पांडवांच्या मदतीने श्रीकृष्णाने जरासंध व त्या सारख्या अनेक दुष्ट राजांचा नाश केला. त्यामुळे श्रीकृष्णाबद्दल सगळ्यांना आदर वाटू लागला.

## जगद्गुरू श्रीकृष्ण

श्रीकृष्णाने पुष्कळ वर्षे द्वारकेचे राज्य केले, पण शेवटी शेवटी सगळे यादव व्यसनी बनले. वाटेल तसे वागू लागले. हे पाहून श्रीकृष्णाला दुःख झाले.

आता येथे राहणे योग्य नाही, असे ठरवून बलराम व श्रीकृष्ण दोघेही वनात निघून गेले. वनामध्ये श्रीकृष्ण एका वृक्षाखाली ध्यानस्थ बसला असता त्याला एका व्याधाचा बाण लागला नि त्यामुळे ह्या थोर पराक्रमी, नीतिमान आणि जगाला योग्य मार्ग दाखविणाऱ्या श्रीकृष्णाचा अवतार संपला

★

BVBK-0400492